# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

*जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,*
*४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व) ,मुंबई ५१.*
*फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६९१*
E-Mail: jtdirrom@gmail.com Web: http://mumbai.dte.org.in


**अत्यंत महत्वाचे व तातडीचे**

क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-३/२०२३/२८२८
दिनांक : - 2 AUG 2023

प्रति,
प्राचार्य,
सर्व अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र
विनाअनुदानीत पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था.
(मुंबई विभागा अंतर्गत)

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये अभियांत्रिकी, औषनिमार्णशास्त्र व वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या व दुस-या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत

संदर्भ:- १. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/वि.सं.ब/२०२३/६८४ दि.०१.०८.२०२३

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, **संदर्भीय पत्रात दिलेल्या निर्देशाचे पालन करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.** तसेच संदर्भीय पत्रात नमुद केल्या नुसार व्दित्तीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यास संस्था व पाठयक्रम बदलासाठी विद्यार्थ्यांना **अर्ज करण्यासाठी दि.०५.०८.२०२३** पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली असून संस्थेने विद्यार्थ्यांचे प्राप्त प्रस्ताव दि.०५.०८.२०२३ पर्यत या कार्यालयास पाठविण्यात यावेत.

तसेच वरील नमुद दिनांकापुर्वी प्राप्त झालेले प्रस्ताव परिपुर्ण नसल्यास ते दप्तरी दाखल करण्यात येतील याची सर्व संस्थांनी नोद घ्यावी.

व्दित्तीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्या शिवाय इतर विद्यार्थ्यांना संस्था स्थलांतरणसाठी दि.३१.०८.२०२३ पर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सोबत :- संदर्भीय पत्राची प्रत

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई-५१.

प्रत :- १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहिती करीता
२. प्रोग्रॅमर, सर्व संस्थांना सदरचे पत्र ई-मेल व्दारे पाठविण्यात यावे

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४६५, ४४२, ४४३
ई-मेल-desk2@dte.maharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dte.maharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२३/६८४ दिनांक : 1 AUG 2023

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,
मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम / पाळी बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ : १) या संचालनालयाचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/वि.सं.ब/२०२३/ , दि.३१.०७.२०२३
२) संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/वि.सं.ब./२०२३/६१०, दि.११.०७.२०२३
३) संचालनालयाचे पत्र क्र.२/एनजीसी/वि.सं.ब./२०२३/६११, दि.११.०७.२०२३

विषयांकीत संदर्भीन परिपत्रक तथा पत्र पहावित.

संदर्भीय क्र. १ च्या परिपत्रकान्वये विद्यार्थ्यांना व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी दिनांक ०५.०८.२०२३ पर्यंत, तसेच द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांशिवाय इतर विद्यार्थ्यांना दि.३१.०८.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आली आहे.

विद्यार्थी संस्था बदलासाठीच्या मुलभूतनीस अनुसरुन निर्धारित प्रकरणी संस्था व आवश्यक स्तरावरुन कार्यवाही करण्यासाठीची कालमर्यादा सोबतच्या प्रपत्र अ व ब मध्ये नमूद केल्यानुसार निश्चित केली आहे. तरी, प्रस्तुत प्रकरणी सोबतच्या प्रपत्र अ व ब मध्ये नमूद केलेल्या कालमर्यादित कार्यवाही करण्यात यावी. सदर कार्यवाही करतांना विभागीय कार्यालय स्तरावरुन व संबंधित संस्थांचे प्राचार्य यांनी नियमांचे काटेकार पालन करावे.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, माहितीसाठी सादर

१) मा. सचिव, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर
२) मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)
३) प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी इ. पदवी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य (संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे मार्फत)
४) कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई
५) कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस.

सहसंचालक, तंत्रशिक्षण,
विभागीय कार्यालय, मुंबई-३२.
आवक क्रमांक : ८७८५
दिनांक - 2 AUG 2023

गोविंद
02/8/2023

# प्रपत्र अ

| अ. क्र. | तपशील | कार्यवाही | कालमर्यादा | कार्यवाही प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | अ) संस्था अंतर्गत शाखा बदल /पाळी बदल | संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार शाखा बदलाची कार्यवाही करावी | दि. ०६.०८.२०२३ किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या ३ दिवस अगोदर यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | प्राचार्य, संबंधित संस्था यांचे स्तरावरून सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांचे मान्यतेने |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल | प्राप्त विनंती अर्जानुसार विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या आधारे विहित नमुन्यातील अर्जावर आवश्यक ती माहिती भरून आवश्यक दस्तावेजासह त्यांचेकडील रिक्त जागांची माहिती व ना-हरकत प्रमाणपत्रासह प्रस्ताव अभ्यासक्रम निहाय सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांना सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह Email द्वारे पाठविण्यात यावेत. | दि. ०७/०८/२०२३ किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या २ दिवस अगोदर यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | संस्था बदलीने प्रवेश देणाऱ्या संस्थेचे प्राचार्य |
| २ | अ) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (विभागांतर्गत विद्यापीठ बदल सह) | विना अनुदानित संस्थकडून संस्था बदलाबाबत विद्यापीठा अंतर्गत प्राप्त अर्जांच्या (१—ब नुसार) अनुषंगाने सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात असणा-या संस्था बदलाचे प्रकरणी मान्यतेची कार्यवाही करावी | दि. ०९.०८.२०२३ किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांक यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |
| | ब) संस्था बदल / संस्था बदलासह शाखा बदल (आंतरविभागीय) | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे १-ब नुसार प्राप्त होणा-या विभागाच्या बाहेरील / आंतरविभागीय प्रस्तावांची दि.२८.०४.२०१७ च्या शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ मधील तरतुदीनुसार छाननी / तपासणी करून सोबतच्या Annexure B च्या विहित नमुन्यातील माहितीसह मान्यतेसाठी एकत्रित प्रस्ताव मान्यतेसाठी तंत्र शिक्षण संचालनालयास पाठविण्यात यावेत. | दि.०८.०८.२०२३ किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा निश्चित (Confirm) करण्याचा दिनांकाच्या ३ दिवस अगोदर यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४६५, ४४२, ४४३
ई-मेल-desk2@dte.maharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dte.maharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२३/६८३ दिनांक : 1 AUG 2023

परिपत्रक

विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम / पाळी बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ : या संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/वि.सं.ब./२०२३/६१०, दि.११.०७.२०२३

उपरोक्त विषयाच्या संदर्भीन परिपत्रकान्वये संस्था व पाठ्यक्रम बदलासाठी दि.१८.०७.२०२३ पर्यंत अर्ज करण्याची कालमर्यादा निश्चित करण्यात आली होती. दरम्यान थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमासाठी नोंदणी, गुणवत्ता याद्या प्रसिध्द करणे, प्रवेशासाठी जागा जाहिर करणे इ. साठीच्या दिनांकास पुढे घेण्यात आल्याने विषयांकीत प्रकरणी अर्ज करण्यासाठी खालील प्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

१. द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना संस्था बदल / पाठ्यक्रम बदलासाठी अर्ज करण्यासाठी दिनांक ०५.०८.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आहे
२. द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांशिवाय इतर विद्यार्थ्यांना दि.३१.०८.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्र शिक्षण, म. रा. मुंबई

प्रत : मा. सचिव, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
   त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थाना अग्रेषित करून संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करण्यास कळविण्यात यावे.
२. प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी पदवी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
   त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करून पुढील उचित कार्यवाही कालमर्यादेत करण्यात यावी.
३. मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)
४. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई
५. कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस.